# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्तविभाग
## राष्ट्रीय बातमीपत्र
## सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः19.09.2025 वारः शुक्रवार

---

- 22 सप्टेंबरपूर्वी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या पॅकिंगवर सुधारित जीएसटी दरांचे नवे स्टिकर लावणं ऐच्छिक.
- वैयक्तिक डिजिटल डेटा संरक्षण विषयक नियमांना अंतिम रूप देण्यात आल्याची केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आश्विनी वैष्णव यांची माहिती.
- मॉन्सून संपल्यानंतर चारधाम यात्रेसाठी हेलिकॉप्टर सेवा सुरू करायला विमानवाहतूक महासंचालनालयाची मंजुरी.
- अफगाणिस्तान मधील बागराम हवाई तळ ताब्यात घेण्यासाठी अमेरिकेकडून प्रयत्न सुरू असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांचं प्रतिपादन.
- आणि

- **आशिय़ा करंडक क्रिकेट स्पर्धेत आज रात्री भारताचा ओमानबरोबर सामना.**

**आता सविस्तर बातम्या.**

**जीएसटी सुधारणा**

ग्राहक व्यवहार मंत्रालयाने सोमवारपासून लागू होणाऱ्या सुधारित वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी दरांनुसार बदलणाऱ्या किमतीचे नवे स्टिकर 22 सप्टेंबरपूर्वी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या पॅकिंगवर लावणं ऐच्छिक असल्याचं स्पष्ट केलं आहे. कंपन्या स्वेच्छेनं पॅकेजवर कोणत्याही योग्य ठिकाणी स्टॅम्पिंग, स्टिकरिंग किंवा ऑनलाइन प्रिंटिंग करून त्यावरील एमआरपी दुरुस्त करू शकतात. मार्च 2026 पर्यंत किंवा असा साठा संपेपर्यंत जीएसटी सुधारणेपूर्वी छापलेलं जुनं पॅकेजिंग साहित्य किंवा रॅपर वापरण्याची परवानगी देखील देण्यात आली आहे. उत्पादक, पॅकर्स आणि आयातदारांनी सुधारित जीएसटी दरांबद्दल वितरक, किरकोळ विक्रेते आणि ग्राहकांना माहिती देण्यासाठी सक्रिय पावलं उचलावीत, असा सल्ला सरकारनं दिला आहे. ग्राहक जागरूकता करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक, प्रिंट आणि समाज माध्यमांसह  शक्य त्या सर्व माध्यमांचा वापर करण्याचीही सूचना करण्यात आली आहे. यामुळे व्यवसाय सुलभता आणि ग्राहक संरक्षण यात संतुलन साधले जाईल आणि उद्योगांवर नियमपालनाचा भार पडणार नाही आणि ग्राहकांना खात्रीलायकरित्या जीएसटी कपातीचा अपेक्षित लाभ मिळेल, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

## जीएसटी वाहन

वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी कररचनेत केलेल्या सुधारणांमध्ये दुचाकी आणि छोट्या मोटारींवरील कर 28 टक्क्यांवरून 18 टक्क्यांवर आणण्यात आला आहे. त्यामुळे वाहनांच्या किमती कमी होणार असून, सणासुदीच्या काळात वाहनखरेदी करणाऱ्या ग्राहकांना फायदा मिळणार आहे. किमती कमी झाल्यामुळे निम्न मध्यमवर्गीय कुटुंबे, तरुण व्यावसायिक आणि त्यांच्या उपजीविकेसाठी आणि दैनंदिन गरजांसाठी परवडणाऱ्या वाहतुकीवर अवलंबून असलेल्या कामगारांना दिलासा मिळणार आहे. खरेदीला चालना मिळाल्याने उत्पादन, विक्री, सेवा आणि वित्तपुरवठा क्षेत्रात रोजगारनिर्मितीलाही चालना मिळेल, ज्यामुळे देशाच्या विकासाचीही गती वाढेल, असं सरकारनं म्हटलें आहे.

## वैष्णव लोगो

वैयक्तिक डिजिटल डेटा संरक्षणविषयक नियमांना अंतिम रूप देण्यात आलं असून, येत्या काही दिवसांमध्ये ते प्रकाशित केले जातील, असं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आश्विनी वैष्णव यांनी काल स्पष्ट केलं.

भारत एआय परिणाम शिखर परिषद 2026चं बोधचिन्ह काल वैष्णव यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आलं. त्यानंतर ते बोलत होते.भारतात सध्या 38 हजार ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्स असून त्यात वाढ होत असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. पाचशेपेक्षा जास्त डेटा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रयोगशाळांमुळं कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात सर्वसमावेशक विकासाचा मार्ग मोकळा होईल असं ते म्हणाले.

**कॅप्सुल महिला सक्षमिकरण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार, सेवा आणि सुशासन हा मंत्र जपत देशात परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. ‘सेवा पर्व’ या आजच्या विशेष मालिकेत मोदी सरकारने महिला सक्षमीकरण अधिक बळकट करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा हा लेखा-जोखा.

स्क्रिप्ट –गेल्या 11 वर्षांत भारत सरकारने महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि कायदेविषयक क्षेत्रात सक्षम करण्यासाठी व्यापक आणि धोरणात्मक पावलं उचलली आहेत. ‘नारी शक्ति’ हा केवळ नारा नसून ते आता राष्ट्रीय अभियान बनलं आहे. हे अभियान शहरी असो वा ग्रामीण, तरुण असो वा वृद्ध, प्रत्येक महिलेला सन्मानाने, सुरक्षितपणे आणि स्वावलंबनाने जगण्यासाठी बळकटी देते. केवळ महिलांचा विकास यावर लक्ष केंद्रित नसून, महिला नेतृत्वाखाली विकास कसा साध्य करता येईल यावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

महिला सक्षमीकरणाबाबत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात..

बाइट पंतप्रधान नरेंद्र मोदी

‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’, ‘लखपति दीदी’ यासारखे उपक्रम या सक्षमीकरणाला अधिक बळकटी देतात. अशाप्रकारे, तळागाळातील प्रशासनापासून ते संरक्षण दल आणि विमान वाहतुकीपर्यंत, महिला आता सर्व क्षेत्रांमध्ये नेतृत्व करत आहेत आणि सर्वसमावेशक आणि शाश्वत राष्ट्रीय विकासाला चालना देत आहेत.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.**

**भारत-ब्लू पोर्ट**

भारत आणि संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी संघटनेनं जागतिक दर्जाचे ब्लू पोर्टस् म्हणजे तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक बंदरं बांधण्यासाठी भागीदारी केली आहे. मत्स्यव्यवसाय विभागानं देशातील ब्लू पोर्ट पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी या संघटनेशी तांत्रिक सहकार्याबाबतच्या करारावर स्वाक्षरी केली आहे. प्रायोगिक पातळीवर प्रथम दीवमधील वनकबारा, पुद्दुचेरीमधील करैकल आणि गुजरातमधील जखाऊ या तीन बंदरांसाठी एकूण 369 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. या बंदरांवर कार्यक्षमता आणि सेवा वितरण वाढविण्यासाठी फाइव्ह-जी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता,ऑटोमेशन आणि डिजिटल प्लॅटफॉर्मसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे, असं मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ.अभिलाक्ष लिखी यांनी सांगितलं.

## चारधाम यात्रा

विमानवाहतूक महासंचालनालय म्हणजे डीजीसीएनं चारधाम यात्रेसाठी हेलिकॉप्टर सेवेला मंजुरी दिली आहे. मॉन्सून संपल्यानंतर ही सेवा सुरू करायला परवानगी देण्यात आली आहे. सुरक्षाविषयक अनेक तपासण्यांनंतर ही परवानगी देण्यात आल्याचं विमानवाहतूक मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. विमानवाहतूक मंत्री राममोहन नायडू यांनी उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांच्यासह डीजीसीए, विमानतळ प्राधिकरण आणि इतर अधिकाऱ्यांबरोबर बैठका घेतल्या. तसंच डीजीसीएनं सर्व हेलिपॅड्स, हेलिकॉप्टर्स आणि सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांच्या बैठका घेतल्या. अधिक उंचीवर हेलिकॉप्टर सेवा पुरवण्यातली जोखीम लक्षात घेऊन त्यासाठी विशेष सुरक्षाव्यवस्था करण्यात आल्याचंही निवेदनात स्पष्ट करण्यात आलं आहे.

## ट्रंप अफगाणिस्तान

अफगाणिस्तानमधील बागराम हवाई तळ ताब्यात घेण्यासाठी अमेरिकेकडून प्रयत्न सुरू असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी काल सांगितलं. अमेरिकेनं या तळावरचं नियंत्रण सोडल्यानंतर तालिबाननं अफगाणिस्तानवर नियंत्रण मिळवलं होतं. हा विमानतळ चीनच्या अण्वस्त्र केंद्रांच्या जवळ असल्यामुळं अमेरिकेला त्याच्यावर नियंत्रण हवं आहे असं ट्रंप म्हणाले. ब्रिटनचे पंतप्रधान केर स्टार्मर यांच्यासह लंडनमध्ये पत्रकार परिषदेत ट्रंप बोलत होते. अमेरिकेनं अफगाणिस्तानवरचा ताबा सोडणं हा अमेरिकेच्या इतिहासातील काळा

अध्याय असल्याचंही ट्रंप म्हणाले. दरम्यान, गाझामध्ये कायमस्वरूपी युद्धविराम जाहीर करण्याच्या संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या ठरावावर अमेरिकेनं काल पुन्हा एकदा नकाराधिकाराचा वापर केला.

**आशिया करंडक**

आशिय़ा करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ग्रुप एमध्ये ओमानशी होणार आहे. अबूधाबीच्या शेख झायेद मैदानावर रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल. ओमान आणि भारतात होणारा हा पहिलाच सामना आहे.

दरम्यान, अफगाणिस्तानचा सहा गडी राखून पराभव करून श्रीलंकेनं सुपर फोरमध्ये प्रवेश केला आहे. अबूधाबीमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात अफगाणिस्ताननं श्रीलंकेसमोर 170 धावांचं उद्दिष्ट ठेवलं होतं. ते श्रीलंकेनं सहा गडी आणि आठ चेंडू राखून पार केलं. कुसल मेंडीसनं 52 धावांमध्ये केलेल्या 74 धावांमुळे श्रीलंकेला विजयाचं उद्दिष्ट सहजपणे पार करता आलं. त्याला सामनावीर या पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या.**

- **22 सप्टेंबरपूर्वी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या पॅकिंगवर सुधारित जीएसटी दरांचे नवे स्टिकर लावणं ऐच्छिक.**

- वैयक्तिक डिजिटल डेटा संरक्षणविषयक नियमांना अंतिम रूप देण्यात आल्याची केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आश्विनी वैष्णव यांची माहिती.
- मॉन्सून संपल्यानंतर चारधाम यात्रेसाठी हेलिकॉप्टर सेवा सुरू करायला विमानवाहतूक महासंचालनालयाची मंजुरी.
- अफगाणिस्तानमधील बागराम हवाई तळ ताब्यात घेण्यासाठी अमेरिकेकडून प्रयत्न सुरू असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांचं प्रतिपादन.
- आणि
- आशिय़ा करंडक क्रिकेट स्पर्धेत आज रात्री भारताचा ओमानबरोबर सामना.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.